# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक :- ५७/२०२३ दिनांक :- १७/०२/२०२३

## वोडाफोन मोबाईल कंपनीत कामास असलेल्या दोन तांत्रिक कामगारांना मोबाईल टॉवर वरील साहित्य चोरी करून विक्री करत असतांना रंगेहाथ पकडण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील भाईंदर पोलीस ठाणे हद्दीत भाईंदर पश्चिम येथील रेल्वे स्टेशनजवळील स्कायवॉकवरील वोडाफोन मोबाईल टॉवरवरील साहीत्य चोरीस गेले बाबत फिर्यादी नामे श्री. अनिल शंकर साळवी, वय ४७ वर्षे, व्यवसाय नोकरी, रा. रुम. नं. ०३, मोरारजी कंम्पाउड, आयआयटी मार्केट, मुंबई यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक १८/१०/२०२२ रोजी भाईंदर पोलीस ठाणेत गुन्हा रजिस्टर नं. ५०१/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडुन समांतर तपास करण्यात येत होता.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना पो.हवा. तावरे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दोन इसम मोबाईल टॉवरचे साहित्य विक्री करण्याकरीता मिरारोड येथे येणार आहेत. मिळालेल्या माहितीची शहानिशा करुन कारवाई करण्याकामी सदर ठिकाणी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सापळा लावून मोबाईल टॉवरचे साहित्य विक्री करण्याकरीता आलेले इसम नामे १) अक्षय दत्ताराम शिंदे, वय २६, धंदा नोकरी, रा. रुम नं ६०१, देवसृष्टी बिल्डींग, फेज-१, राजीव गांधी शाळे जवळ, निळे मोरेगांव, नालासोपारा (प), २) फकीर त्रिनाथ जेना, वय ३६, धंदा नोकरी, रा. महादेव नगर बिल्डींग नं ०६, रुम नं १५, नालंदा गेस्ट हाऊस समोर, नवघर रोड, भाईंदर पुर्व यांना मुद्देमालासह पंचनामा करून ताब्यात घेतले. त्यांच्याकडे सखोल विचारपूस करता त्यांनी ते वोडाफोन कंपनीत टेक्नीशिअन्स म्हणून काम करीत असुन गेल्या ५ ते ६ महिन्यापासुन टॉवर वरील थोडा-थोडा माल चोरी करून इसम ३) जुगेश बिंदु गुप्ता, वय ३३, धंदा भंगार दुकान, रा. इंदिरा नगर, झोपडपटटी, हनुमान नगर, भाईंदर पुर्व यास विक्री करीत असल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्यांनी यापुर्वी देखील मुंबईमध्ये समतानगर व दहीसर परीसरात असे गुन्हे केले असल्याबाबत चौकशीत निष्पन्न झाल्याने त्यांना नमूद गुन्हयात अटक करण्यात आली आहे. आरोपी क्रमांक ३ याच्या दुकानातून एकुण १,१२,७५० रूपये किंमतीचे मोबाईल टॉवरचे पार्ट हस्तगत करण्यात आले आहेत. नमूद आरोपीतांकडून खालील नमुद गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

### : - उघडकीस आलेले गुन्हे : -

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | भाईंदर पोलीस ठाणे | गु.र.नं. I ५०१/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| २. | समता नगर पोलीस ठाणे, मुंबई | गुरनं I १३१२/२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | समता नगर पोलीस ठाणे, मुंबई | गुरनं I ११४१/२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | दहिसर पोलीस ठाणे, मुंबई | गुरनं I १४७२/२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्री.अविनाश आंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि.राहुल राख, स.पो.नि. सरक, पो.हवा. मनोहर तावरे, प्रविण पवार, नांगरे, पो.अंम. हनुमंत सुर्यवंशी यांनी केलेली आहे.

----oooo----